88

ISSN 2394-5303

International Multilingual Research Journal

# Printing Area

Issue-39, Vol-01, March 2018



Editor

Dr.Bapu G.Gholap

(3) Dr. Sanjay Talatkar (Eco)

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 06

# Index


01) Use of Libraries by Students In Aided Colleges In Tribal Areas of Maharashtra : A Study
**Dr. Rashmi Shyamsundar Bakane, Kinwat Dist-Nanded** || 10

02) Job Satisfaction of higher secondary teachers
**Dr. Ritu Bhardwaj—Arti Sharma, Rajasthan** || 12

03) DEMONETIZATION CONTROLLED TERRORISM? : PREDICTION & REALITY IN.....
**Mr. Bharat Bapu Bichitkar, Barshi, M.S.** || 15

04) Socio-economic Dimensions of Swachh Bharat Abhiyan: An Overview
**Mrs. Shweta M Borkar, Bicholim, Goa.** || 19

05) Impact of Demonetization on Indian Economy
**Pramod Bhagwat Gadekar—Dr.D.B.Tanduljekar** || 24

06) Solid Waste Management: Health & Social Needs of Bilaspur City (C.G)
**Dr.(Smt) Garima Tiwari—Dr. Narendranath Guria, Chhatisgarh** || 28

07) Five *Bhaavs* with special reference to *PaarinaamikBhaav* as the.....
**Rajal Borundia Jain. V, Chennai, Tamil Nadu** || 35

08) A Study of Career Maturity (Competency) in Relation to Self-Concept of....
**Ms. Ravinder Pal Kaur—Dr. Indira Shukla, Mumbai** || 41

09) DIGITAL PAYMENT SYSTEM
**Dr P. N. Ladhe, Malkapur** || 44

10) Keats's Aestheticism
**Dr. Prakash. N. Meshram, Mulchera** || 50

11) NARRATIVE STYLE & TECHNIQUE IN STORIES OF MANOJ DAS
**Dr. Manas Ranjan Misra, Odisha (Ganjam)** || 54

12) Study of the Utility of Activity Based Learning Material
**Dr. (Mrs.) Madhuchanda Mukherjee, Jabalpur, (M.P.)** || 58


www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com



सहायक ... महिला महाविद्यालय ...

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 07

13) AGRICULTURE AND NEW INFORMATION TECHNOLOGY

**Dr. Yajnya Dutta Nayak, Berhampur** || 64

14) Affirmative Action for Welfare of Women in India:A Step towards Gender Equality

**Dr. Mamata Patra, Dhenkanal, Odisha** || 69

15) Total Fertility Rate (TFR) in India reached at replacement levels: A Sign of.....

**Dr. K.Mary Sujatha— Ms.B.Freya Christina, A.P.** || 73

16) Depiction of Mother & Daughter relation in Charles Dickens "Bleak House"

**A. Varalakshmi—Dr. V. Sri Rama Murthy—Dr. V. B. Chitra** || 76

17) SCOPE OF ONLINE QUICK SERVICE RESTAURANTS INDUSTRY IN INDIA

**Sawitri Devi, Bahadurgarh (Haryana)** || 79

18) Khalil Gibran's The Prophet: A Thematic Study

**Dr. Md. Nurul Amin Sheikh, Dhubri, Assam** || 82

19) दलीत आत्मचरीत्रे परिचय आणि प्रेरणा

**प्रा.विनोद जगन्नाथ कांबळे, ता.पैठण, औरंगाबाद** || 88

20) दहशतवाद : एक अभ्यास

**प्रा. पवार बी. टी., शिरुर कासार जि.बीड.** || 91

21) स्वंतत्र भारतातील कर रचना आणि जी.एस.टी चे महत्व

**डॉ.संजय भा. तळतकर, गेवराई, बीड** || 94

22) प्रौढ महिला विद्यालयात ऑनलाईन टीचिंगचे महत्त्व

**बनाटे चंद्रमा सुधाकर, औरंगाबाद.** || 99

23) भारतीय राज्यघटनेतील स्त्रीविषयक कायदे/ तरतुदी:-

**जयश्री भावसार** || 101

24) भारतातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय योजना

**प्रा. प्रफुल्ल ओ. कालोकार—प्रा. डॉ. नितिन बी. कावडकर** || 103

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

25) नारदीय कीर्तनाच्या माध्यमातून हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार
डॉ. मुक्ता पी. महल्ले, अमरावती || 108

26) मनोहर सप्रे:व्यंगचित्रकला, आस्वाद आणि चिकित्सा
श्री. हेमराज डी. निखाडे, नागपूर || 110

27) हिंदी साहित्य और अल्पसंख्यांक विमर्श (मुस्लिम समाज के संदर्भ में)
डॉ.सुनीता भिमराव राठोड, औरंगाबाद || 115

28) समकालीन हिंदी कविता में पारिस्थितिक सजगता
डॉ. सुरेश ए., एर्णाकुलम, केरल || 117

29) हिंदी साहित्य की प्रगुख दलित आत्मकथाएँ
मुल्ला आदम अली, तिरुपति || 120

30) संगीत एवं सौन्दर्य
मधुलता, दिल्ली || 123

31) महिला लेखिकाओं की आत्मकथाएँ और उपन्यासों में नारी जीवन की समस्याएँ
मुल्ला आदम अली, तिरुपति || 127

32) आ. महावीरप्रसाद द्विवेदी के काव्य में व्यक्त राष्ट्रीय भाव
अविनाश जाधव, परली–वै. जिला:बीड || 130

33) माध्यमिक स्तर पर सामाजिक अध्ययन विषय के शिक्षण हेतु परम्परागत एवं नवाचार....
डा. एम. के. उपाध्याय–बनवारी लाल मेहरा, कोटा (राज.) || 133

34) हिंदी संतो और कन्नड के शिवशरणों के साहित्य की प्रासंगिकता
डॉ. सन्मुख नागनाथ मुच्छटे, माकणी जिला उस्मानाबाद || 136

35) दैनिक जीवन मे अष्टांग योग का महत्व
डॉ. श्याम सुन्दर पाल, अमरकंटक (म.प्र) || 138

36) स्वातंत्र्योत्तर हिन्दी–तेलुगु नाटकों में स्त्री–पुरूष सम्बंन्धों का समाज सापेक्ष्य अध्ययन
डॉ.एम.रघुनाथ, वरंगल, तेलंगाणा || 142

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 09


37) भारत में एक राष्ट्र एक कर प्रणाली 'जी.एस.टी.' कर सुधार का अध्ययन
डॉ. तामेंश्वरी साहू, धमतरी, छत्तीसगढ़ || 147

38) अब्दुल बिस्मिल्लाह की कहानीयाँ एवं संवेदना
अशोक कुमार सिंह, मुजफ्फरपुर, बिहार || 152

39) कालिदास कृत 'कुमार सम्भवम्' में कामदेव–दहन सम्बन्धी मिथक
डॉ. अनीता शर्मा, लुधियाना || 154

40) वर्त्तमान समय में मीडिया का प्रभाव विकासशील राष्ट्र के संदर्भ में एक अध्ययन
मनोज कुमार सिंह, मुजफ्फरपुर || 156

41) परिवर्तित सामाजिक विधानों के प्रति ग्रामीणों का दृष्टिकोण–एक.....
आरती तिवारी || 161

42) गोंड़ जनजाति के प्रवासी श्रमिकों का आर्थिक अध्ययन....
गंगेश्वरी ठाकुर, जबलपुर (म.प्र.) || 163

43) अमृत नाहटा के नाटकों में राजनीतिक व्यंग्य
डॉ. सुधीर गणेशराव वाघ, हिंगोली (महाराष्ट्र) || 167

44) जम्मू कश्मीर में पाक प्रायोजित आतंकवाद
डॉ० निधि रायजादा–अनुतोष कुमार, बादलपुर (गौतमबुद्धनगर) || 170

45) आादिवासियों पर आधुनिक तकनीकी के प्रभाव का अनुशीलन
डॉ. रमेश चौहान, नीमच (म.प्र.) || 173

46) आदिवासी विमर्श :स्वरुप एवं संवेदना
डॉ. संजय गडपायले, जि.परभणी || 174

47) महिला कल्याण कार्यक्रम–अपराध एवं कानूनी संरक्षण
डॉ. अन्जू जगधारी, नीमच || 179


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 094

21

# स्वंतत्र भारतातील कर रचना आणि जी.एस.टी चे महत्व

डॉ.संजय भा. तळतकर
महिला महाविद्यालय, गेवराई, बीड

**********

**प्रस्तावना:-**

विसाव्या शतकाव्या मध्यापर्यंत शासन व्यवस्थेला महसुल गोळा करणे, सरंक्षण, कायदा व सुव्यवस्था राखणे हीच जबाबदारी पार पाडावी लागत होती.विसाव्या शतकाच्या मध्यानंतर जगात संरक्षण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच देशातील नागरीकांचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकविकास करणे ही शासनाची जबाबदारी आहे. अशी संकल्पना रूढ होऊ लागली. यासाठी कल्याणकारी अर्थसत्तेचे धोरण असे नांव दिले. शासन व्यवस्थां सामाजिक कल्याणासाठी वेगवेगळे सामाजिक उपक्रम हाती घेऊ लागली. महत्तम सामाजिक कल्याण साधन्यासाठी अन्न, वस्त्र व निवारा या बरोबर शिक्षण, आरोग्य, सार्वजनीक रस्ते, विज निर्मिती, जलसंधारण ई अनेक उपक्रम सुरू केले यामुळे शासनाच्या सार्वजनिक खर्चात मोठया प्रमाणात वाढ होऊ लागली. हा खर्च भागविण्यासाठी सरकारला उत्पन्नाचे साधन म्हणजे कर गोळा करणे हे होय . "कर म्हणजे शासनाचा खर्च भागविण्या करीता शासनाने कायद्यनुसार जनतेकडून वसुल केलेली सक्तीची रक्कम होय" अशी सोपी व्याख्या आपणास करता येते. भारत सरकारला राज्य घटना कलम २६५ अंतर्गत कर गोळा करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. या कराद्वारे जमा केलेल्या रकमेचा वापर जनतेच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांचा खर्च भागविण्यासाठी केला जातो.

**कर आकारणी:-**

भारतामध्ये प्राचीन काळापासून कर आकारणी होत असलेली आपणास दिसुन येते राजेशाही व्यवस्था, ब्रिटीश काळातील करव्यवस्था ह्या काही प्रमाणत जूलमी स्वरूपात या होत्या मीठा वरील करासाठी महात्मा गांधींना सत्यागृहा सारखे आंदोलन करावे लागले होते. भारताला १५ ऑगस्ट १९४७ त्या स्वातंत्र्य मिळाले त्या नंतर करव्यवस्था व कराची आकारणी कशी करावी यासाठी घटनेने नियम घालून दिले आहेत राज्य घटनेच्या नियमानुसार केंद्रसरकार व राज्य सरकार यांना कर गोळा करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

लोकशाही शासन व्यवस्थेत कर गोळा करताना करपध्दती चांगली असावी लागते या करपध्दतीमध्ये न्यववाटा, तटस्थता, कार्यक्षमता, उत्पादकता, सरलता, निश्चितता, लवचिकता, विविधता आणि पारदर्शकता हे गुणधर्म असले पाहीजेत. आणि स्वतंत्र भारतातील करपध्दतीमध्ये कर आकारताना गुणधर्मांकडे जास्त लक्ष देण्यात आले आहे. स्वंत्रत भारतामध्ये केंद्रसरकार, राज्यसरकार महानगर पालीका,नगर पालीका, ग्रामपंचायत या सर्व यंत्रणा वेगवेगळया प्रकारचा कर आकारताना दिसुन येतात हे सर्व कर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपाचे आहेत. कोणी कोणते कर गोळा करावयाचे या संबंधीचे नियम राज्यघटनेने घालून दिलेले आहेत . यामध्ये आपण भारत सरकारच्या अधिकारातील कर आकारणी पाहू. केंद्र सरकार प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष अशा दोन प्रकारच्या कराची आकरणी करते

**प्रत्यक्ष कर-** जेव्हा कराघात व करापात एकाच व्यक्तिवर पडतो तेव्हा त्यास प्रत्यक्ष कर असे म्हणतात" उदा उत्पन्न कर,निगम कर, व्यवसायकर ई.

**अप्रत्यक्ष कर:-**

'जेव्हा कराघात एका व्यक्तीवर पडतो मात्र त्या कराचा करापात हा दूसऱ्या व्यक्तीवर होतो. तेव्हा त्यास अप्रत्यक्ष कर म्हणतात' उदा: GST, आयात शुल्क, ई हा कर हस्तांतरणीय असतो.

**१) आयकर:- (Income Tax)**

सन १९३९ मध्ये भारतसरकारने आयकर कायदा पास केला. उत्पन्नावर आकारला जाणारा कर म्हणजे आयकर. सन १९६१ मध्ये भाररत सरकारने प्रचलित आयकर कायदा सुधारना करून आयकर अधिनियम १९६१ पास केला. या कायद्यातील तरतुदीनुसार आयकराची वसुली केली जाते. यामध्ये अल्पकालीन भांडवली लाभकर, दिर्घकालीन भांडवली लाभ कर, लॉटरी,गेम शो, घोडयाच्या शर्यती, काळयापैशावरील आयकर, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 095

वेतन उत्पन्न व व्यवसायातून मिळालेले निव्वळ उत्न या वर आयकर आकारला जातो. शेती वरील उत्पन्नावर आयकर आकारला जात नाही २०१६-१७ पर्यंत आयकराने १०%, २०%, ३०% असे तीन स्तर होते तर २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी ५%, १०%. व २०% , ३०% असे स्तर आहेत. सन २०१६-१७ नुसार भारत सरकारला एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १४% उत्पन्न ह्या करापासून मिळते.

**२) निगम कर ( Corporation Tax)**

नोंदणीकृत देशी संस्था आणि परकिय संस्थाच्या उत्पन्नावर आकारला जाणारा कर म्हणजे निगम कर होय. निगम कर हा केंद्र सूचितील विषय क्रमांक ८५ आहे. निगम करासाठी आयकर कायदा १९६१ हाच कायदा लागु आहे. निगम कर हा केंद्राला कोणत्याही करापेक्षा सर्वाधीक उत्पन्न मिळवून देणारा कर आहे. भरीव उत्पना बरोबरच गुंतवणुकिला प्रोत्हासन मिळावे व त्यातुन देशाचा आर्थिक विकास व्हावा असा उद्देश या करा मागे आहे. देशी संस्थावर सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात कराचा दर ३०% आणि २५% हे दोनस्तर ठेवले आहेत तर विदेशी संस्थाच्या निव्वळ नफ्यावर ४०% दराने निगम करम आकारला जातो. व त्यावर ३% शिक्षण उपकर आकारला जातो. या करापासून २०१६-१७ मध्ये भारत सरकारला एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १९ % उत्पन्न मिळाले.

**३) संपत्ती कर (Tax on Wealth)**

भारत सरकारने १९५७ मध्ये प्रा. कॉलडॉर समितीच्या शिफारसी नुसार हा कर आकारण्यास सुरूवात केली. संपत्ती कर कायदा १९५७ नुसार मे १९५७ पासुन व्यक्ती आणि संस्थाच्या संपत्तीचे मुल्य निर्धारण करून विशिष्ट मर्यादा ओलांडल्यास संपत्ती कर आकाराला जाऊ लागला. केंद्र सूचीतील विषय क्र ८६ नुसार केंद्राला संपत्तीच्या भांडवली मूल्यावर कर आकारण्याचा अधिकार आहे. संपत्तीचे मुल्य ३० लाखापेक्षा जास्त झाल्यास १% संपत्ती कर आकारला जातो २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात संपत्ती कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या ऐवजी आयकरावरील अधिभार २% ने वाढविण्यात आला संपत्ती कर बाद केल्यामुळे २०१४-१५ मध्ये १०८६ कोटी रू महसूल मिळाला. तो मिळणे बंद झाले. आयकरावरील अधिभारामुळे अधिभार उत्पन्न २०१५-१६ मध्ये ७५०० कोटी रूपयापर्यंत गेले. संपत्ती करातुन महसुल कमी येत असे व हा कर गोळा करण्यास येणारा खर्च जास्त येत असल्यामुळे हा कर रद्द करण्यात आला .

**४) मालमत्ता कर ( Estate Duty)**

वारसा हक्काने उत्तराधिकाऱ्याला मिळणाऱ्या मालमत्तेवर आकारला जाणारा कर म्हणजे मालमत्ता कर होय. भारतीय राज्य घटनेतील केंद्रसूचितीतल विषय क्र ८७ नुसार केंद्रसरकार शेतजमीन वगळता मालमत्तेच्या वारसा हस्तांतरणावर कर आकारने. मालमत्ता कर कायदा १९५३ नुसार हा कर आकारला जाऊ लागला. करवसूलीवरील खर्च जास्त व कमी महसूल या कारणास्तव सन १९८५ मध्ये पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळात व्ही.पी.सींग अर्थमंत्री असताना हा कर रद्द केला.

**५) देणगी कर ( Gift Tax)**

भारत सरकारने १९५८ मध्ये देणगी कर कायदा पास केला व या १९५८ च्या कायद्यानुसार हा कर आकारला जाई. मात्र ऑक्टोबर १९९८ पासुन ही कर आकारणी बंद करण्यात आली.

**६) व्यवसाय कर:- (Professional Tax)**

व्यवसाय कर हा राज्ये आकारात असलेला एक प्रत्यक्ष कर आहे. राज्य घटनेतील कलम २७६ तसेच राज्य सुचीतील विषय क्रमांक ६० अन्वये व्यवसाय. व्यापार आणि रोजगारावर कर आकारण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आला आहे सध्या २१ राज्ये व्यवसाय कर आकारतात महाराष्ट्र राज्याने १९७२-७३ मध्ये रोजगार हमी योजना सूरू केली. या योजनेच्या खर्चाची व्यवस्था करण्यासाठी १९७५ पासून महाराष्ट्रात २४० रु दराने व्यवसाय कर आकारण्यास सूरूवात झाली. राज्यात वार्षीक २५०० रू व्यवसाय कर आकारला जाते. १४ व्या वित्त आयोगाने व्यवसाय कर आकारण्याची उच्चतम मर्यादा २५०० वरून १२००० रू प्रतिवर्ष करण्याची शिफारस केली आहे.

वरील सर्व कर हे प्रत्यक्ष स्वरूपाचे होत की आता आपण भारतीय कररचनेतील अप्रत्यक्ष कर पाहू.

**७) सीमा शुल्क- (Custom Duties)**

मालाच्या आयात निर्यातीवर लागणारा कर म्हणजे सीमा शुल्क, सीमा शुल्क हा केंद्रसूचीतील विषय क्र ८३ असून यासाठी सीमाशुल्क कायदा १९६२ लागु आहे. निर्यात वस्तूवर निर्यात कर व



प्राध्यापक

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 096

आयात वस्तुवर आयात कर आकारतात. देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयात कर आकरला जातो जागतीकीकरणानंतर आयात शुल्काचे देशी उद्योगांना संरक्षण देणे हा उद्देश कमी होत चालला आहे निर्याती मध्ये वाढ होण्यासाठी निर्यात शुल्क नेहमी कमी आकारले जाते. आयात कर आणि निर्यात कर यापासून मिळणाऱ्या या महसूलाचा विचार केल्यास एकूण सिमा शुल्का पैकी ९६ ते ९७ % वाटा आयात कराचा आहे. भारत सरकारला २०१६-१७ मध्ये एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ९ % उत्पन्न या करापासून मिळाले.

### ८) उत्पादन कर (Excise Duty)

ब्रिटीश सरकारने सन १८८४ मध्ये सूती धाग्यावर उत्पादन कर लागु केला. सन १८८५ मध्ये कर आकारण्यास सुरूवात केली १९१७ मध्ये स्पिरिट हा कर लागु केला. सन १९४४ मध्ये या सरकारने मध्यवर्ती उत्पादन व मीठ कायदा पास केला, व २८ फेब्रुवारी १९४४ रोजी हा कायदा संपूर्ण भारतभर लागु केला. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने या कायद्यात कोणताही बदल न करता तसाच ठेवला. या कायद्यात एकूण ४० कलमे असुन आतापर्यंत या कायद्यात अनेकवेळा दूरूस्त्या करण्यात आल्या. शासनाकडून वस्तुउत्पादन कर आकारणी पासुन मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये उत्पादन कराचा सर्वात मोठा वाटा आहे. उत्पादन करभार जरी त्या उत्पादकावर पडत असला तरी त्यांचा करघात मात्र उपभोक्त्यावर पडतो. दारु, ओपियम,गांजा व मादक पदार्थ याच्या उत्पादनावर उत्पादन शुल्क आकारण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे. कच्चे पेट्रोलीयम, पेटोल, डिझेल, नैसर्गीक वायू व विमान इंधन हे केंद्र सरकारचे विषय आहेत. हे सर्व वगळता इतर उत्पादनावरील उत्पादन शुल्क GST मध्ये समाविष्ट झाले आहेत.

### ९) सेवा कर ( Service Tax)

भारतीय राज्यघटने च्या ७ व्या परिशिष्टातील समवर्ती सुचीमध्ये सेवाकराची तरतूद आहे. सन १९९२ मध्ये भारत सरकारने नेमलेल्या राजा चेलैय्य समितिने सेवाकर आकारण्यासंबधी शिफारस केली. या समितीच्या शिफारसीवर आधारित केंद्रसरकारने १९९४ च्या वित्तिय अधिनियमानुसार सेवाकर आकारण्यास सुरूवात केली. जम्मु- काश्मीर वगळता सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशामधून सेवाकर गोळा केला जातो. ८८ व्या घटनादुरूस्ती कायद्यानुसार २६८ A हे स्वतंत्र कलमही टाकण्यात आले. GST चे - १२२ वे घटनादूरूस्ती विधेयक संमत होऊन झालेल्या १०१ व्या घटना दूरूस्ती कायद्यानुसार २६८ A हे कलम आणि केंद्रसूचितील ९२८ हे दोन्ही विषयकाढून टाकले . १९९४ वित्तीय कायदा बाद झाला असुन सेवावारील सेवाकर GST मध्ये समाविष्ट झाल्याने GST भरण्यासाठी वार्षिक उलाढाल मर्यादा २० लक्ष आहे. सन २०१६-१७ नुसार भारत सरकारला या करापासून एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ९% उत्पन्न मिळाले होते.

### १०) खर्च कर (Expenditure Tax)

भारत सरकारने सन १९८७ मध्ये नेमलेल्या टी.टी. कृष्णाम्माचारी समितिच्या शिफारसी नुसार भारत सरकारने खर्च कर लागु केला. हा कर फक्त हॉटेलांनाच लागु होतो. ज्या हॉटेलचे खोली भाडे दिवसाकाठि ४०० रुपयापेक्षा अधिक आहे अशा हॉटेलांना हा कर लागु आहे.

### ११) व्याजकर ( Interest Tax)

भारत सरकारने सन १९७४ मध्ये व्याज कर अधिनियम पास केला. बँकांना मिळणाऱ्या ठेवी व बँकानी ईतरांना दिलेले कर्ज या मधील व्याजाचा फरक हे बँकांचे उत्पन्ना मानले जाते. हे उत्पन्न घटक मानून भारत सरकाने त्यावर कर आकारण्यास सूरूवात केली सहकारी बँका वगळता इतर सर्व बँकांना मिळणाऱ्या उत्पन्नावर हा कर लागु होतो.

### १२) किमान कंपनी कर-

शुन्य कर सवलत घेणाऱ्या सर्व कंपन्यावर १२% दराने किमान कंपनी कर आकारला जातो. भारत सरकारने १९९४-९५ पासून हा कर आकारण्यास सुरूवात केली.

### १३) वस्तु आणि सेवा कर (Goods & Service Tax)

वस्तु आणि सेवाकर आकारला जाणारा मुल्यवर्धीत प्रणालीचाकर ही GST ची ओळख आहे. एप्रील १९५४ मध्ये फ्रान्स या देशाने सर्वप्रथम GST आकारला सध्या १६० पेक्षा जास्त देशात GST आकारला जातो. आजही अमेरिका, सौदी अरेबिया ग्रिनलँड सारख्या देशात GST आकारला जात नाही GST मध्ये कोणकोणते कर समाविष्ट झाले आहेत ते पहावे लागले GST मध्ये एकूण १७ प्रकारचे अप्रत्यक्षकर, अधिभार व उपकर समाविष्ट झालले आहेत. यामध्ये केंद्रिय उत्पादन शुल्क, सेवाकर, औषधी व



सहायक प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 097

सौदर्य प्रसाधनावरील उत्पादन शुल्क, महत्त्वाच्या वस्तुवरील अतिरिक्त उत्पादन शुल्क, कापड व कपडयावरील अतिरिक्त उत्पादन शुल्क, सीमा करावरील प्रतिशुल्क, सीमाकरावरील विशिष्ट अतिरिक्त शुल्क, वस्तु व सेवाकर आकारले जाणारे विविध केंद्रिय अधिभार उपकर केंद्रिय विक्रीकर या कराबरोबरच राज्यातील काही कराचा समावेश GST मध्ये झालेला आहे. या मध्ये राज्यविक्रीकर, खरेदी कर, ऐषआराम, करमणुकर कर, जाहीरात कर, लॉटरी ,जुगार व सट्टेबाजी वरील कर प्रवेश कर राज्याचे विविध अधिभार उपकर आणि मूल्यवर्धीत कर हे सर्व कर रद्द होऊन या जागी एकच कर आला तो म्हणजे वस्तु आणि सेवा कर. अर्थात GST

भारतामध्ये वस्तु व सेवा कराची कल्पना सर्व प्रथम फेब्रुवारी २००७ च्या अर्थसंकल्पात मांडली होती. वस्तु आणि सेवाकर कायदा पास करण्यासाठी घटनेमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. जेणे करून केंद्र व राज्यांना हा कर आकारण्याचा आणि गोळा करण्याच्या एकाच वेळी सक्षम अधिकार प्रापत होईल. यासाठी डिसेंबर २०१४ मध्ये विधेयक लोकसभेत मांडण्यात आले हे १२२ वे घटना दुरूस्ती विधेयक लोकसभेत २०१५ मध्ये मंजूर झाले. एप्रील २०१७ मध्ये अंमलबजावणी होईल असे ठरले होते. मात्र प्रत्यक्षात १ जुलै २०१७ पासुन या कराची अंमलबजावणी सूरू झाली या कराद्वारे मिळणारे उत्पन्न केंद्र व राज्यांना प्रत्येकी ५०% मिळणार आहे. केंद्रिय वस्तु आणि सेवाकर (CGST) आणि राज्य वस्तु सेवा कर (SGST) वेगवेगळया प्रकारे वसुल करण्यात येत आहे . या कराचा दर ३%, ५%, १२%, १८% आणि २८% अशा प्रकारचा दर GST परिषदेने ३-४ नोव्हेंबर २०१६ ला झालेल्या सभेत ठरविण्यात आला CGST केंद्राला, SGST राज्याला तर UTGST केंद्रशासीत प्रदेशाला मिळणार आहे. या करापासुन जूलै मध्ये ९५००० कोटी, ऑगस्ट मध्ये ९१००० कोटी, सप्टेंबर मध्ये ९२१५० कोटी, ऑक्टोबर मध्ये ८३००० कोटी, नोव्हेंबर मध्ये ८०८०८ कोटी रुपये महसूल मिळाला आहे. या करापासून मिळणारा महसूल कमी होत असलेला दिसतो.

भारतामधील कर रचनेमध्ये वारंवार बदल झालेले आपणास दिसुन येतात यामध्ये सर्व एकसंघ भारतात प्रत्येक राज्यात वेगवेगळा कर असल्यामुळे वस्तुच्या किंमती सर्वत्र सारख्या नव्हत्या यावर उपाय म्हणुन 'एक देश एक कर' ही प्रणाली लागु करण्यासाठी वस्तु आणि सेवा कराची अंमलबजावणी करणे गरजेचे होते त्यासाठी काही कायदेशिर प्रक्रिया पार पाडणे ही गरजेचे होते.

**वस्तु व सेवा कर कायदा:-**

१. जी.एस.टी. संबंधित १०१ व्या घटनादुरूस्ती कायद्यानुसार टाकण्यात आलेल्या नवीन कलमापैकी २४६A नुसार राज्यांतर्गत वस्तु व सेवा व्यापारावर कर आकारण्याचा अधिकार संसद व राज्यांच्या विधानसभांना आहे. तर २६९A नुसार आंतराज्यीय वस्तु व सेवा व्यापारावर कर आकारण्याचा अधिकार संसदेला आहे.

२. जी.एस.टी. आकारणी मध्ये कच्चे पेट्रोलीयम, पेट्रोल, डिझेल, नैसर्गीक वायू, विमान इंधन, यांचा समावेश नाही, तंबाखू व तंबाखू उत्पादने यावर जी.एस.टी. व केंद्रिय उत्पादन शुल्क हे दोन्हीही आकारले जाते. घटनेतील केंद्रसूची आणि राज्यसूचीत या वस्तु वरील अप्रत्यक्ष कराचा उल्लेख करण्यात आला उर्वरीत सर्व वस्तु व सेवावरील अप्रत्यक्ष करांचे विषय १०१ व्या घटना दुरूस्ती कायद्यानुसार केंद्रसूची व राज्यसूचीतून कमी करण्यात आले आहेत. व त्यावर जी.एस.टी. आकारणी झाली आहे.

३. २४६A नुसार राज्यांतर्गत व्यापारासाठी ,संसदेला कायदा करावा लागला (CGST Act) जो की तो १२ एप्रील २०१७ ला संसदेने संमत केला.

४. २४६A नुसार राज्यांतर्गत व्यापारासाठी विधानसभांना कायदा करावा लागला त्यामध्ये २८ राज्यांची (SGST Act) त्यांच्या विधनसभांनी संमत केले उदा महाराष्ट्राने MGST Act (Maharashtra Goods and Sevice Tax) २२ मे २०१७ ला संमत केला. तसेच ज्या ठिकाणी विधनसभा नाहीत म्हणजेच ५ केंद्रशासीत प्रदेशात हा कायदा संसदेने केला (UTGST Act) संमत केला.

५. २६९A नुसार आंतराज्य व्यापारासाठी संसदेला कायदा करावा लागला (IGST) Intergrated GST Act जो की १२ एप्रील २०१७ ला संसदेने संमत केला.

६. हा कायदा करताना एका राज्याचा प्रश्न उरला ते राज्य म्हणजे जम्मु-काश्मीर. जम्मु काश्मीरसाठी वरील GST, IGST कायदे अद्याप लागु झालेले नाहीत आणि SGST कायदा अजून जम्मु काश्मीरने संमत केला नाही.

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | March 2018 Issue-39, Vol-01 | 098

७. १०१ व्या घटना दुरूस्ती कायद्यातील कलम १८ नुसार पूढील ५ वर्ष GST अंमलबजावणीमूळे राज्याचे होणारे नुकसान केंद्र सरकार भरून काढेल यासाठी केंद्रसरकारला GST (Compensation to State) Act 2017 हा कायदा करावा लागला.

थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की घटनादुरूस्ती कायदासह ३५ कायदे GST च्या पाठीमागे उभे राहिले १०१ घटना दुरूस्ती कायदा, CGST कायदा, ३UTGST कायदे, IGST कायदा, २८SGST कायदे आणि ,जीएसटी नुकसान भरपाई कायदा या ३५ कायद्यामुळे मात्र कैंद्राच्या व राज्याच्या शेकडो कायद्याची गरज राहीलेली नाही. हे सर्व कायदे आता बाद झालेले आहेत.

**जीएसटीचे महत्व:-**

भारतामध्ये वस्तु आणि सेवा कर लागु करण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. यासाठी सरकारला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. हे सर्व करण्यामागे एक चांगला उद्देश होता. की ज्यामुळे देशाच्या महसूलामध्ये वाढ होऊन सर्व भारत देशात एकच कर राहील म्हणजेच 'एक देश एक कर ही संकल्पना प्रत्यक्षात जी.एस.टी. मुळे आपणास पहावयास मिळाली आहे. याचा फायदा देशातील प्रत्येक घटकाला मिळणारा आहे.

१. देशात कुठेही पूरवठा केल्यास समान जीएसटी दर राहील त्यामुळे देशभरात एक सामाईक बाजार तयार होईल व सामान्य जनतेला संपूर्ण देशात कोठेही वस्तु विकत घेतली तर एकाच किंमतीला मिळेल

२. संपूर्ण देशात एकत्र बाजारपेठ असल्यामुळे परकीय गुंतवणुकदार आकर्षित होतील व गुंतवणूक वाढेल

३. परकीय वस्तु आयातीवर आयात शुल्का सोबतच १८% आयजीएसटी लागल्यामुळे परकीय वस्तु महाग होऊन स्वकीय वस्तुची मागणी वाढेल व स्वदेशी वस्तु उत्पदनास चालना मिळेल.

४. निर्यात वाढणे व आयात कमी झाल्यामुळे रूपयाला मजबुती प्राप्त होईल.

५. समान जीएसटी दर यामुळे व्यवसायात सुलभता येईल व्यापाऱ्यांना अनेक कर भरण्याची गरज राहणार नाही करदाता व करविभाग यांच्या मध्ये समन्वय राहील.

६. जीएसटी लागु झाल्यामुळे टॅक्स चोरी कमी होईल त्याचा परीणाम सरकारच्या उत्पन्नावर होऊन सरकारच्या महसुलात मोठया प्रमाणात वाढ होईल

७. केंद्राची व राज्याची विविध वस्तु व सेवांच्या वर्गीकरणाची पध्दत एक समान झाली आहे. कायदे समान झाले आहेत.

८. जीएसटी कराचे दर कमी झाले आहेत परिणामी वस्तु स्वस्त होतील व ग्राहकाची क्रयशक्ती वाढेल

९. डिझेल पेटोल वर जीएसटी आकरल्यास त्याच्या किंमती कमी होतील परिणामी वाहतूक खर्च कमी होईल याचा परिणाम जीवनावश्यक वस्तुच्या किंमती कमी होतील, भविष्यात डिझेल व पेट्रोलवर सरकार, जीएसटी आकारण्याच्या विचारात आहे.

थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की जीएसटी कायदा लागु केल्यामुळे सध्यातरी सरकारी महसूलात घट होत आहे. मात्र भविष्यात या करामुळे सरकारी महसूलात वाढ निश्चित होऊ शकते अशी अपेक्षा करणे योग्य राहील.

**संदर्भ:-**


१. इंडियन इकॉनॉमी, दत्त सुंदरम एस चांद एन्ड कंपनी प्रा.ली नवी दिल्ली

२. राजस्व आणि राजस्वनीती, डॉ.वि.शि.शेणवाई, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळा करिता विद्या बुक्स औरंगाबाद

३. भारतीय अर्थव्यवस्था, श्रीधर देशपांडे, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपुर

४. ईकॉनॉमिक्स, डॉ.किरण जी देसले, दीपस्तंभ प्रकाशन, जळगांव

५. व्यापारी मित्र जी.डी. शर्मा, व्यापारी मित्र पब्लिकोन्स प्रा.ली.पुणे

६. वस्तु व सेवा कर, प्रा.मंगेश शिरसाठ, प्रा. निवृत्ती नानवटे, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद


❑❑❑

सहाय्यक प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई